RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ५, अंक ६८] बुधवार, जून १९, २०१९/ज्येष्ठ २९, शके १९४१ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १५४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**विधि व न्याय विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ जून २०१९

**अधिसूचना**

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३.**

क्रमांक संकीर्ण-०८१६/६२५/प्र.क्र. १०१/कार्यासन-११.—फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २), महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि या बाबतीत यापूर्वी काढण्यात आलेल्या सर्व शासकीय अधिसूचनांचा मुंबई येथील उच्च न्यायालयाशी विचारविनिमय केल्यानंतर, जेथवर प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, भुसावळ यांच्या न्यायालयाशी संबंधित असतील तेथवर, त्यामध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे असे निर्दिष्ट करीत आहे की, दिनांक १६ जून, २०१९ पासून,—

(क) जळगाव जिल्ह्यातील बोदवड या ठिकाणी, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय स्थापन करण्यात येईल.

(ख) बोदवड पोलीस ठाणे अंतर्गत क्षेत्रामध्ये आणि यासोबत जोडलेल्या अनुसूची 'अ' मध्ये नमूद केलेल्या गावामध्ये उद्‌भवणारी व प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी, भुसावळ आणि न्यायाधिकारी, ग्राम न्यायालय, बोदवड यांच्याकडे दाखल केलेली व प्रलंबित असलेली फौजदारी प्रकरणे ही, प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी, बोदवड यांच्या न्यायालयाकडे दिनांक १६ जून, २०१९ पासून हस्तांतरीत होतील ; आणि

(ग) यासोबत जोडलेल्या अनुसूची 'अ' मध्ये नमूद केलेल्या गावांमध्ये उद्‌भवणारी व बोदवड पोलीस ठाण्याच्या क्षेत्रात येणारी फौजदारी प्रकरणे, प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी, बोदवड यांच्या न्यायालयामध्ये दिनांक १६ जून, २०१९ पासून दाखल करण्यात येतील व तेथे चालविण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**यो. ही. आमेटा,**
शासनाचे सहसचिव.

## अनुसूची 'अ'

## गावांची यादी

| अ. क्र. (१) | गावाचे नाव (२) | अ. क्र. (१) | गावाचे नाव (२) | अ. क्र. (१) | गावाचे नाव (२) |
|---|---|---|---|---|---|
| १. | बोदवड | १८. | चिंचखेडे सीम | ३५. | भानखेडा |
| २. | मनुर बुद्रुक | १९. | पळासखेडे खुर्द | ३६. | गोळेगाव बु. |
| ३. | मनुर खुर्द | २०. | एणगाव | ३७. | गोळेगाव खुर्द |
| ४. | जामठी | २१. | निमखेड | ३८. | सुरवाडे बु. |
| ५. | रेवती | २२. | राजुर | ३९. | सुरवाडे खुर्द |
| ६. | लोणवाडी | २३. | वराड बु. | ४०. | मानमोडी |
| ७. | येवती | २४. | वराड खुर्द | ४१. | विचवे |
| ८. | कुऱ्हेहारदो | २५. | शिरसाळा | ४२. | मुक्तळ |
| ९. | धोंडखेडा | २६. | हिंगणे | ४३. | वराड बु. |
| १०. | शेवगे खुर्द | २७. | आमदगाव | ४४. | वराड खुर्द |
| ११. | चिखली बु. | २८. | जुनोने | ४५. | बोरगाव |
| १२. | शेवगे बु. | २९. | हरणखेड | ४६. | पळासखेडे बु. |
| १३. | चिंचखेड प्र. बो. | ३०. | घाणखेड | ४७. | साळशिंगी |
| १४. | नाडगाव | ३१. | वडजी | ४८. | जलचक्र बु. |
| १५. | नांदगाव | ३२. | करंजी | ४९. | जलचक्र खुर्द |
| १६. | सोनोटी | ३३. | धानोरी | ५०. | शेलवड |
| १७. | कोल्हाडी | ३४. | पाचदेवळी | ५१. | वाकी |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**यो. ही. आमेटा,**

शासनाचे सहसचिव.